# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपलिका
# कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना
# जाहिर निविदाक्रमांक :– 6

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल, पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| 1. **कोरे निविदा प्रपत्र विक्री** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून मंगळवार दिनांक 04/05/2010 पासून सोमवार दिनांक 24/05/2010 पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| 2. **निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून मंगळवार दिनांक 25/05/2010 रोजी दुपारी 1.00 वाजे पर्यंत |
| 3. **निविदा (अ कागदपत्रांचे पाकीट) उघडण्याची तारीख व वेळ** | मंगळवार दिनांक 25/05/2010 रोजी दुपारी 3. 00 वा. किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| 4. **व्हर्च्युअल क्लासरुमचे प्रात्यक्षिक (डेमो.)** | बुधवार दिनांक 26/05/2010 रोजी दुपारी 3.00 वा. |
| 5. **निविदा दराचे पाकीट (Comercial Bids) उघडण्याची तारीख व वेळ** | शुक्रवार दिनांक 28/05/2010रोजी दुपारी 3.00 वा. |

**6 शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष 2010–11 अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –**

| अ.क्र. | तपशील | तरतुद रूपये | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| 1 | **व्हर्च्युअल क्लासरूम सुविधा** उपलब्ध करणे व त्याअनुषंगाने आवश्यक बाबींचा पुरवठा करणे | 5,00,00,000/– | 2,000/– |

**सुचना –**

**1.** निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा 1 टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी, स्पेसिफिकेशन निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

**2.** निविदा प्रसिध्दी प्रक्रिया, अनुषंगिक करार इ. सर्व बाबींकरिता महाराष्ट्र शासनाने 2 जानेवारी 1992 रोजी प्रसिध्द केलेला शासन निर्णय व शिक्षण मंडळ कायदा 1947 व नियम 1949 चे तरतूदीस अधारितच असेल.

**3.** कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील

**4.** सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व षिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/–** | **स्वाक्षरी/–** |
| **अध्यक्ष,** | **शिक्षणप्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** | **शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका** |

# निवीदा अटीचा नमुना

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

# शिवाजी नगर, पुणे 411005

## व्हर्च्युअल क्लासरुम सविधा पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती 2010–11.

1. संदर्भः–

पुणे दैनिक सकाळ व टाईम्स ऑफ इंडिया दि. 04/05/2010 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र. 6/भांडार/व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा – पुणे शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांकरिता व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविणे कामी **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा अटी खालीलप्रमाणे :–**

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या **खरेदी समितीने** शैक्षणिक आर्थिक वर्ष 2010–11 चे करिता खालील **परिशिष्ठ अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ठ ब** मध्ये नमूद केलेल्या व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा विशिष्ट मुदतीत उपलब्ध करुन देण्यासाठी निवीदा अटी, शर्ती व स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे. –

**परिशिष्ठ अ**

**2. अटी व शर्ती :–**

1. निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
2. निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**3. अ. पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा 1 टक्का या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅंकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) कार्यालयात चलनाने समक्ष भरावा दिनांक 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस. एस. आय. युनिट असले तरीसुध्दा बयाणा रकमा रोख भराव्या लागतील.

**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र

**क)** आर्थिक वर्ष 2008–09 मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च 2009 अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.

**ड)** शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविलेबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

**इ)** निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.)छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न प्रत.

**ई)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदांरांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

**ए)** व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक

**उ)** निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करणे संबंधिची आर्थिक क्षमता असल्या बाबतचे बॅंकेचे प्रमाणपत्र (बॅंक सॉलव्हान्सी) चालू वर्षाची निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रकमेचे

**ऋ) अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.**

4. पाकीट ब मध्ये निविदा धारकाने बाबनिहाय सर्व करासह दर भरावेत (व्हॅट, जकात, इ.) (The Tender rates are inclusive of all taxes, cesses & are also inclusive of the lieviable tax in respect of sale by trancfer of proparty in goods involed in the execution fo a work contract under the provision of the rule 58 of Maharashtra value added tax act 2005 for the purpose of levy of tax) दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रमांक नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

5. **अ** पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

6. **ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे –**

विहीत नमुन्यातील व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविणे बाबतचे दरपत्रक सर्व करासह द्यावेत.

7. **निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

1. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविण्याचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

2. निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे .

3. निविदा धारकास निविदेची रक्कम कमी झाल्यास सदरबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

4. मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5. मान्य निवीदादारास करार करतेवेळी व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) किंवा रोखीने भरावी लागेल.

6. निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2010–11 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही

8. व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस व मा.शिक्षण मंडळास राहील.

9. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

तसेच व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविणेबाबतच्या स्पेसिफिकेशनमध्ये काही किरकोळ बदल मा. शिक्षण मंडळाने सुचविल्यास त्याप्रमाणे बदल करुन देण्यास निविदादारास बंधनकारक राहील.

**10.** करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेशननुसार मुदतीत व्हर्च्युअल क्लासरुमची सुविधा न पुरविल्यास ते स्विकारले जाणार नाहीत. मुदतीत तयार करण्यात आलेल्या व्हर्च्युअल क्लासरुम सुविधेमध्ये तयार न झालेले व्हर्च्युअल क्लासरुमसुविधा 10 दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू. 5000/– (अक्षरी रूपये पाच हजार फक्त ) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या व्हर्च्युअल क्लासरुमची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या व्हर्च्युअल क्लासरुमच्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

**11.** व्हर्च्युअल क्लासरुमची सुविधा तपासणी करुन दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा असल्याची खात्री मा. खरेदी समितीस / मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही. तसेच देय बिलातून आयकर कलम 194 सी नुसार टी.डी.एस. च्या रकमेची कपात केली जाईल.

**12.** एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस / मा. शिक्षण मंडळास राहील तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

**13.** मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवष्यक आहे.

**14.** निविदादाराने व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविण्यास तयार झालेल्या आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा. खरेदी समितीस / मा. शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

**15.** व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

**16.** व्हर्च्युअल क्लासरुमची सुविधा पुरविल्यानंतर त्याची मा. खरेदी समिती / मा. शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. पुरविलेले व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल. खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे नसलेले व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

**17.** निविदादाराचे स्पेसिफिकेशन किंवा पुरविलेल्या व्हर्च्युअल क्लासरुम सुविधेबाबत खरेदी समितीस काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी सक्षम प्रयोगशाळेकडून करण्यात येईल. व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहिल.

**18** मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा कामाचे एकत्रित देयक मा. शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरवठा करताना प्राप्त केलेली पोहोच पावती संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाच्या नाव, स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील.

**19.** व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविलेबाबत पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

**20.** व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविलेबाबत जे प्रॉडक्टस् / साहित्य खरेदी केले जाईल त्याची मालकी खरेदी केलेल्या दिवसापासून मा. शिक्षण मंडळाची राहील.

21. व्हर्च्यअल क्लासरुम सुविधा पुरविणेबाबत ज्या निविदादाराची निविदा मान्य होईल. त्या निविदादाराने निविदा रक्कमेइतक्या रक्कमेचा विमा काढणे आवश्यक आहे. व त्या विम्याची मुदत व्हर्च्युअल क्लासरुम सुविधा पुरविण्याच्या कालवधी इतकी असेल. (ऑल रिस्क इंशुरंन्स पॉलिसी, इ

22. व्हर्च्यअल क्लासरुम सुविधा पुरविणेबाबतचे काम सुरु झाल्यापासून काम संपेपर्यंत आग, व इतर कोणत्याही नैसर्गीक कारणाने नुकसान झाल्यास त्यास शिक्षण मंडळ जबाबदार राहणार नाही.

23. व्हर्च्यअल क्लासरुम सुविधा पुरविणेचे काम पुर्ण झाल्यापासून पाच वर्षापर्यंत त्यामध्ये काही बिघाड झाल्यास निविदादारास सदरची दुरुस्ती विनामुल्य करुन द्यावी लागेल. तो पर्यंत अनामत व बयाणा रक्कम परत मिळणार नाही.

**24.** निविदा **दिनांक 10 मे, 2010 रोजी दुपारी 3 वाजता** किंवा मा. शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीवरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**पुणे.**

**दिनांकः—**

**स्वाक्षरी / —**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**स्वाक्षरी / —**
**शिक्षणप्रमुख,**
**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————————————————————————वय——————वर्ष

व्यवसाय — धंदा, राहणार ——————————————————————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निवीदेच्या, फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

पुणेः—

दिनांकः—

**पुरवठा धारकाची नाव, सही व शिक्का**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# स्पेसिफिकेशन सन 2010 – 11

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
# व्हर्च्युअल क्लासरुम
# बयाणा रक्कम रुपये 5,00,000 / –

निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 25 मे, 2010
वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत

सोबत स्पेसिफिकेशन जोडलेले आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी / – | स्वाक्षरी / – |
| अध्यक्ष, | शिक्षणप्रमुख, |
| शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका | शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका |

# SCHOOL BOARD PUNE MUNICIPAL CORPORATION
# TENDER FOR LUMPSUM CONTRACT
# TENDER AND CONDITIONS

## NOTE

1. Where earnest money is to be deposited unless the tender must be accompanied by a receipt from the officer in charge of PMC Bank of Maharashtra for the requisite amount which will be repaid by administrative officer school board the tender should be accepted

   In case the tender is accepted the earnest money will be appropriated to the security deposit required from him S.D.is 5% & EMD is 1% total 6% will be kept as retention money
2. If the tender is accepted no seprate agreement shall be necessary and the tender itself shall be treated as the contract
3. For signature on the tender see rule within.

## GENRAL RULES AND DIRECTIONS FOR THE GUIDANCE OF THE CONTRACTORS

1. In the event of the tender being submitted by a firm, it must be signed by each partner here of or in the event of the absence of any partner, it must be signed on his behalf by a person holding a power of Attorney athorising him to do so.
2. Receipts for payments made on account of any work, when executed by a firm should also be signed by all the partners except where the contractors are described in their tender as firm in which case the receipts shall be signed in the name of the firm by one of the partners or by some other person having authority to give effectual receipts for the firm.

   i) The contractor shall pay along with the tender the sum of Rs. 5 lakh only as mentioned in detailed tender notice by way of earnest money. The said amount of earnest money shall not carry any intrest whatsoever

   ii) In the event of his tender being accepted, subjected to the provisions of sub clause (iii) below the said amount of earnest money shall be approprieated towords the amount of security deposit payble by him under para 3.5 of detailed tender notice.

   iii) If after submitting the tender the contractor withdraws his offer or modifies the same or if after the acceptance of his tender the contractor fails of furnish the balance of security deposit without prejudice to any other rights and powers of the school board, PMC here under or in law shall be entitled to forfeit the full amount of the earnest money deposited by him.

   iv) In the event of his tender not being accepted the amount of earnest money deposited by the contractor shall unless it is prior there to forfeited under the provisions of sub clause (iii) above, be refunded to him on his passing receipt
3. The amount of earnest money to be deposited shall be at the rate of 1 % of the estimated cost of the work or at such higher percentage rate as may be fixed by the officer concerned in accordance with the provisions of paras 206 & 207 of the public works department manual 6$^{th}$ edition 1984. Such earnest money should generally be paid by the contractors in the manner as detail in the tender notice.

4. The administrative officer school board, PMC, Pune will open tenders in the presence of contractors who have submitted tenders or their representatives who may be present at the time and he will enter the amounts of the several tenders in comparative statement in a suitable form. In the event of a tender being accepted the contractor shall thereupon for the purpose of identification sign copies of the specifications and such other documents as may be necessary. In the event of a tender being rejected by the authority to refund the amount of the earnest money deposited to the contractor placing the tender on his giving a receipt for the return of the money

5. The officer competent to dispose off the tenders shall have the right of rejecting all or any of the tenders

6. The tendering contractor shall furnished a declaration along with the tender showing all works for which he has already entered into contract and the value of the work that remains to be executed in each on the date of submitting the tender

7. In view of the difficult position regarding the availability of forigen exchange no foreign exchange would be released by the department for the purchase of plant and machinery required for the execution of the work contracted for.

8. The contractor will have to storing controlled and valuable materials hardware at work site having security arrangement. The marerials will then be taken for used in the presence of department person. No material will be allowed to be removed from the site of the works without permission of the department.

9. The contractors shall give a list of machineries software & hardware in their possession and which they propose to use on the works.

10. The contractors should produce evidence of their registration in appropriate category (valid on the date of submission of tender) otherwise the tender will not be considered.

11. Contractor(s) should produce original licence / attested copy of license duly attested by Gazatted Officer having registered with the Assistant Commissioner of labour as required as per contract labour (Regulation and Aboliton) Act, 1970 and Maharashtra contract Labour (Regulation and Aboliton) Rules, 1971 after the work is awarded.